शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष दहावे : अंक पंचवीस - सव्वीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" -


शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित


**पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव**

• Accredited B++ with CGPA 2.76 by NAAC • ISO मानांकन 9001:2015 •

ता. तासगाव, जि. सांगली



# लोकसंस्कृतीची आविष्कार रूपे




शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष दहावे : अंक पंचवीस व सव्वीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

# लोकसंस्कृतीची आविष्कार रुपे

**● संपादक ●**

**प्रा.(डॉ.)शिवकुमार सोनाळकर**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

**● अतिथी संपादक ●**

**डॉ.मिलिंद हुजरे**

प्राचा[illegible]भूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि.सांगली

**डॉ.तातो[illegible]** **डॉ.शहाजी पाटील**

**● कार्यकारी संपादक ●**

डॉ.नीला जोशी

**● संपादक मंडळ ●**

प्रा.(डॉ.)नं[illegible] डॉ.गोमटेश्वर पाटील डॉ. तातोबा बदमे डॉ.दिनेश वाघुंबरे

**● सल्लागार समिती ●**

डॉ. [illegible] डॉ. प्रकाश कुंभार डॉ. डी. ए. देसाई डॉ. अनिल गवळी

**● प्रकाशक ●**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११

**मुद्रक**

देशमाने ऑफसेट,

औद्योगिक वसाहत, पलूस, (जि. सांगली) ४१६ ३१०, मो. ९९७०७००७५८

**मूल्य: ₹ ३००**

ी संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. शिवकुमार सोनाळकर, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी देशमाने ऑफसेट, औद्योगिक वसाहत, पलूस येथे छापून अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११ येथे प्रकाशित केली. या प्रत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, सल्लागार व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

| | | |
|---|---|---|
| मराठी दळणगीतातील सामाजिक–नैतिक मूल्याविष्कार | डॉ. यादव सूर्यवंशी | ४०१ |
| पोतराजांचे विधिनाट्य आणि पोतराजाची गीते | डॉ.शरद गायकवाड | ४१३ |
| संत एकनाथांच्या भारुडांतून व्यक्त झालेली लोक संस्कृती | डॉ.आनंद वारके | ४१७ |
| आदिवासी भिल्लांच्या बोलीभाषिक लोककथा | डॉ. दीपककुमार वळवी | ४२० |
| लोकसंस्कृतीचा प्रयोगरूप आविष्कारः गोंधळ | माणिक नामदेव बनकर | ४२४ |
| लोकसाहित्य – संकल्पना, स्वरुप व व्याप्ती एक दृष्टिक्षेप | सुवर्णा रामचंद्र शिंगाडे | ४२८ |
| लोकसाहित्या प्रयोग आविष्कार : तमाशा | डॉ. चंद्रकांत शंकर कांबळे | ४३१ |
| लोकसंस्कृतीतील स्त्रियांची समृद्ध लोकगीतगंगा | दादासाहेब ईश्वर गायकवाड | ४३५ |
| लोकसाहित्याचे संशोधन : स्वरूप व व्याप्ती | डॉ. डी. आर. गायकवाड | ४३९ |
| लोक नाट्य तमाशा : लोकल ते ग्लोबल | गुंडोपंत पाटील | ४४३ |
| तमाशा कलावंतांचे सामाजिक जीवन आणि संस्कृती | डॉ. सुनील चंदनशिवे | ४४८ |
| लोकसंस्कृतीचे उपासक–वाघ्या–मुरळी | डॉ.प्रशांत गायकवाड | ४५१ |
| तमाशाचे बदलते स्वरूप | डॉ. नितीश पांडूरंग सावंत | ४५५ |
| लोकसाहित्य एक कला प्रकार : उखाणा | डॉ. शर्मिला घाटगे | ४५९ |
| लोककथेची निवेदन तंत्रे | डॉ. सुरेश बा. शिंदे | ४६२ |


ISSN No. 2319-6025

# लोकसाहित्या प्रयोग आविष्कार : तमाशा

डॉ. चंद्रकांत शंकर कांबळे
किसन वीर महाविद्यालय, वाई

**प्रस्तावना**

गायन, वादन, नृत्य आणि विनोद यांनी युक्त असलेला लोककलेचा एक आविष्कार म्हणजे 'तमाशा' होय. प्रारंभीच्या काळात तमाशा पिंपळाच्या पारावर उघड्या मैदानात किंवा प्रेक्षकांच्या चौफेर गराड्यात होत असे. गेल्या तीनशे वर्षांपासून तमाशा बहुजनांच्या रंजनाची भूक भागवीत आहे. त्यामुळे ग्रामीणांबरोबरच नागर लोकांमध्येही तमाशाबद्दल मोठे आकर्षण असल्याचे दिसते. पूर्वीच्या काळी मनोरंजनाची साधने कमी होती, त्यामुळे या कलाप्रकाराकडे जनमानसाचा कल मोठ्या प्रमाणात होता. अशा या तमाशाची जडण घडण गोंधळ, जागरण यांसारख्या विधी नाट्यातून झालेली असावी. त्यातून अनेक वैशिष्ट्ये घेऊन व त्यावर स्वतःचा ठसा उमटवून तमाशाने रंजनप्रधान रुप प्राप्त केले. विधीनाट्ये आणि तमाशा यांच्यामध्ये असलेला परस्पर संबंध यातून स्पष्ट होताना दिसतो.

पूर्वीच्या काळी तमाशाचा फड उभा करणारी व्यक्ती ही बहुधा शाहीर असे. तो फडाचा सरदार व मुख्य गायकही असे. डफ, तुणतुणे, ढोलकी, सूरपेटी, हलगी, टाळ, खंजिरी इ. वाद्यांच्या साथीने तमाशाचे सादरीकरण होत असे. तमाशामध्ये सोंगाड्याची भूमिका महत्त्वाची असते. पेशवेकाळात नृत्य करण्यासाठी पुरुषाचा उपयोग केला जात असे. 'शाहीर परशरामाच्या फडामध्ये एकूण तेरा माणसे होती, भवानी तेली उर्फ बाकेराव हा नाच्या व सोंगाड्या अशी कामे करीत असे,'८ अशी माहिती मिळते. 'दीर्घ कथात्मक कवन तमाशातून सादर केले जाई. लावणी चालू असताना विनोदी हावभाव करून अक्षर अधूनमधून लावणी चालू असतानाच विनोदी कोट्या करुन सोंगाड्या प्रेक्षकांची करमणूक करीत असे, अशी माहिती गंगाधर मोरजे यांनी दिली आहे.'९ बदलत्या काळात 'पुरुष' नाच्या जाऊन त्याठिकाणी स्त्री 'नर्तिके'चा प्रवेश झाला व ती तमाशाचा केंद्रबिंदू बनली. ज्यांच्या तमाशात तरूण स्त्री नर्तिका अधिक त्यांच्या तमाशांना आधिक बिदागी देऊन त्यांचे कार्यक्रम ठेवले जात.

तमाशाच्या खेळाला कमीत कमी आठ ते दहा माणसे लागतात. तमाशाचा सरदार, ढोलक्या, सोंगाड्या, नाच्या आणि दोन सुरते किंवा झिलकरी अशा मोजक्या माणसांच्या आधारे पेशवेकालीन तमाशा उभा असे. तमाशाचा मुख्य फडमालक अधून मधून हलगी शेकवून चढ्या कडक स्वरात वाजवितो. तमासगीर आपल्या या नायकाला सरदार म्हणतात. पुरुषपात्रांपैकी दुसरे मुख्य पात्र म्हणजे सोंगाड्या. तमाशात हास्य निर्माण करण्याची जबाबदारी सोंगाड्यावर असते. तो हजरजबाबी व नावाप्रमाणे सोंग बदलणारा असतो. महाराष्ट्रात तमाशाचे खानदेशी व वानदेशी किंवा वायदेशी असे प्रमुख दोनच प्रकार असले, तरी खडी गंमत, कोल्हाटणीचा तमाशा असेही प्रकार आहेत.

ISSN No. 2319-6025

तमाशामध्ये गण, गौळण, लावणी, बतावणी(फार्सा), वग आणि मुजरा हे अविभाज्य घटक आहेत. या घटकांचे विश्लेषण केल्यास 'तमाशा ' या कलाप्रकाराचे स्वरुप अधिक स्पष्ट होईल.

**गण**

गण म्हणजे गणपतीचे स्तवन. गणपती हा विघ्नहर्ता आहे, तो समूहमनाचा देव आहे. आपला कार्यक्रम यशस्वीपणे पार पडावा, यासाठी गणेशाची आराधना तमाशाप्रमुख आपल्या साथीदारांसह कडे, ढोलकी, तुणतुणे, टाळ, सूरपेटी इ. वाद्यांच्या गजरात उंच आवाजात करतो व अन्य साथीदार त्याचे ध्रुवपद आळवितात. गण वा 'गणेशवंदनाची प्रथा नाथपंथी परंपरेतून भेदिकात आली होती.शिवभक्ती समावेशनातील सृष्टीरचनेचा तो आद्य आविष्कार, एक गणनायक, लोकसंस्कृतीतील एक गिश, म्हणून त्याला वंदनाचा पहिला मान.' १० अशी डॉ. शिवाजीराव चव्हाण यांनी गणेश वंदनाची परंपरा सांगून तिचे महत्त्व प्रतिपादन केले आहे, तर डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणतात, 'गणपती सामान्यांचा लोकदेव आहे. प्राचीन काळापासून अग्रपूजेचा मान गणपतीला दिला आहे. तो बुद्धिचा दाता आहे. अमंगलाचे निवारण करणारा मंगलमूर्ती आहे. त्यामुळे तमाशासारख्या लोकरंजन करणाऱ्या संस्थेने गणपती नमनाला प्राधान्य दिले ते परंपरेला अनुसरुनच.'११ रंगमंचाचे पूजन झाल्यानंतर सर्व कलाकार रंगमंचावर येऊन, तमाशा रंगतदार व्हावा म्हणून श्रीगणेशाला साकडं घालतात.

शाहीर पठ्ठे बापूराव यांच्या तमाशाच्या फडातील गणाचे स्वरुप या संदर्भात लक्षात घेता येईल.

'आधी गणाला रणी आणा ।
नाहीतर रंग पुन्हा सुना सुना ।।धृ।।
धन्य शारदा ब्रह्म कन्या ।
घेऊन येईल रूद्र विणा ।
साहिशास्त्राचा मंत्र अस्त्राचा ।
दाखविल यंत्र खाणा खुणा ।
सदगुरू माझा स्वामी जगद्गुरू ।
मेरू वरांचा धरू आणा आणा ।
ब्रह्मांडाभवता, तो एक सवता ।
दिवाच लाविल म्हण म्हणा ।
माझ्या मनाचा मी-तू पणाचा ।
जाळुनी केला चुना चुना ।
पठ्ठे बापूराव कविच्या कवनाचा ।
हा एक तुकडा जुना जुना ।। '१२

असे म्हणत गणरायाला प्रथम मान दिला जातो. त्याचा आशीर्वाद नसेल, तर पुन्हा सारा रंग सुना होऊन जाईल, अशी धारणा या कलावंतांची आहे. तमाशातील गणाचे स्वरुप ध्यानात घेतल्यावर एक परंपरा म्हणूनच गणाचा समावेश त्यात झाला असावा, असे म्हणता येईल. 'विशेषतः भेदिक फडाशी तमाशाच्या रुपाचे जे साधर्म्य


ISSN No. 2319-6025

दिसते, त्यावरून भेदिक फडातून तमाशात गण आला, असे आपण म्हणू शकतो. गण गाण्याची धाटणी मात्र गोंधळातून तमासगिरांनी उचलली असावी.'१३ असेही म्हणता येते.

**गौळण**

तमाशामध्ये गणानंतर गौळणीचा रंगतदार कार्यक्रम सादर केला जातो. गौळणीच्या कार्यक्रमात कृष्ण, त्याचा सवंगडी(सोंगाड्या), राधा(नाची) आणि मावशी अशी पात्रे असतात. दह्यादुधाची विक्री करण्यासाठी मथुरेच्या बाजाराला गौळणी, मावशी या प्रौढ गौळणीबरोबर जायाला निघतात. वाटेत कृष्ण त्यांची वाट अडवितो आणि त्यांच्याकडे 'अस्सल दान'(कर) मागतो. आढेवेढे घेत साऱ्या गौळणी कृष्णाची भक्ती करतात व कृष्ण त्यांची वाट मोकळी करतो.

अशा प्रकारे अनेक गौळणी गद्य-पद्य रूपात सादर होताना दिसतात. भक्ती हा प्रधान हेतू या गौळणींच्या रचनेत असतो. उत्स्फूर्त संवाद, कोटीवजा भाषा, काळाशी सुसंगत आशय इ.वैशिष्टे गौळणींची सांगता येतील.

**लावणी**

'लावणी ' हा तमाशाचा आत्मा आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. तमाशात विविध प्रकारच्या लावण्या नाचून, गाऊन सादर केल्या जातात. तमाशात सादर केल्या जाणाऱ्या लावणीला 'फडाची लावणी' असे म्हटले जाते. शृंगारिक हावभाव आणि दिलखेचक नृत्याच्या आधारे ती सादर केली जाते. लावणीत लावणीबरोबरच ती सादर करणारी नृत्यांगना महत्त्वाची असते. अनेकदा तिच्या नावानेच तमाशा चालतो. तमाशातील लावणी नृत्याबरोबर बांधलेली असते. 'तमाशातील लावणी नुसती ऐकायची नसते, तर ती पहावयाची असते. लावणीचा प्रत्येक प्रयोग वेगळा आणि नवा असतो.'१६ प्रयोगरूपात लावणीची मूळ संहिता निमित्तमात्र राहते व संगीत, नृत्य, नाट्य, गीत अशा अंगाने विमुक्तपणे तिचे सादरीकण होत असते. म्हणजे तमाशातील विमुक्ततेचे वैशिष्ट्य लावणीतूनही दिसून येते.

**बतावणी**

बतावणी हा तमाशातील एक उपप्रकार आहे. यात काल्पनिक किंवा अतिशयोक्तपूर्ण गप्पा मारल्या जातात. 'बाता मारणे म्हणजे बतावणी. बतावणी म्हणजे वस्तुस्थितीचा विसर पाडायला लावणाऱ्या मारलेल्या अवास्तव बाता. ही बतावणी वरवर निरर्थक वाटणारी पण अंतरंगातून सार्थ, आशयघन असते.'१७ अनेकदा थापा मारताना उत्स्फूर्त विनोदही केले जातात. तमाशातील हा भाग पाहताना प्रेक्षकांना तो खराखुरा वाटायला लागतो. बतावणीला 'फार्सा', 'रंगबाजी', 'संपादणी' अशीही नावे आढळतात. एखादी छोटीशी विनोदी कथा रंगवून अतिशयोक्त पद्धतीने दोन मित्र एकमेकांना सांगत असतात. यातील संवादांकडे प्रेक्षक केवळ मनोरंजनाच्या दृष्टीने पाहत असतो. 'इंगजी नाटकाच्या अनुकरणातून १८५६ साली फार्स किंवा प्रहसन मराठी रंगभूमीवर आलेले दिसते.'१८ त्यानंतर शाहीर पठ्ठे बापूराव 'फार्सा' हा विनोदी घटक तमाशात आणताना दिसतात. 'त्यांनी रचलेला 'सासू-जावयाचा फार्स' हा तमाशात सादर करणारा पहिला कवी होय.'१९ तमाशातील विमुक्ततेचे वैशिष्ट्य याठिकाणीही

आढळून येते. जवळ कसलीही लिखित संहिता नसताना उत्स्फूर्तपणे, चाणाक्षपणे, हजरजबाबीपणे संवादांची निर्मिती करुन विनोद निर्माण केलेला दिसतो.

**वग**

तमाशाच्या उत्तरंगातील कथानाट्य म्हणजे वग. वगाचे स्वरुप हे सामान्यतः नाटकासारखे असते. तमाशाच्या शेवटी त्याचे सादरीकरण होते. वग म्हणजे नाट्य रुपाने सादर केलेली कथा. या कथा पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक किंवा लोककथा असतात. तमासगिरांना वगाची केवळ कथा माहीत असते. या कथांमधील संवाद लिखित नसून पात्रांनी ते आपापल्या मगदुराप्रमाणे बोलायचे असतात.

लोकरंगभूमीवरील इतर लोककलाप्रकारांप्रमाणेच तमाशाचेही दोन भाग पडतात. एक पूर्वरंग व दुसरा उत्तररंग. पूर्वरंगात गण, गौळण, लावणी, बतावणी तर उत्तररंगात कटाव–शिलकाराने सुरूवात होऊन वगनाट्य आकारास येते. 'वग' म्हणजे ओघा ओघाने येणाऱ्या घटना होय. 'वग' हा शब्द 'ओघ' या शब्दाचे खेडवळ रूप आहे. वगाच्या प्रारंभी एक चार–पाच ओळीची लावणी असते, तिला 'शिलकार' असे म्हणतात. या शिलकारामधून वगाचा आशय थोडक्यात सांगितला जातो आणि पुढील कथाभागाविषयी प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण केलेली असते.

**संदर्भ**

१) जोशी लक्ष्मणशास्त्री, 'वैदिक संस्कृतीचा विकास', प्राज्ञ प्रकाशन, वाई, पृ.२

२) डॉ. वरखेडे र.ना.(संपा.) : 'लोकसाहित्य व लोककला,' विद्याबलम् प्रकाशन, धुळे, १९९३, पृ.४५.

३) व्हटकर नामदेव, 'मराठीचे लोकनाट्य तमाशा : कला आणि साहित्य,' यशश्री प्रकाशन, कोल्हापूर, १९७५, पृ.३६.

४) डॉ.चंदनशिवे गणेश, 'तमाशा – मराठी विश्वकोश,' प्रथमावृत्ती, आंतरजालावरून.

५) व्हटकर नामदेव, उनि. पृ.१९.

६) तत्रैव, पृ.४३.

७) डॉ.चंदनशिवे सुनील, 'तमाशा : कला आणि जीवन,' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०११, पृ.१३.

८) केळकर य.न., शाळिग्राम शं.तु.(संपा.), 'ऐतिहासिक पोवाडे,' चित्रशाळा प्रकाशन, पुणे(प्रस्तावना), पृ.५.

९) मोरजे गंगाधर, 'मराठी लावणी वाङ्मय,' मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७४, पृ.४३.

१०) डॉ. वरखेडे र.ना., उ.नि., पृ.५२.

११) शिंदे विश्वनाथ, 'पारंपरिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य,' प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९४, पृ.७३.

१२) तत्रैव, पृ.७४,७५

१३) तत्रैव, पृ.७५